परिपत्रक क्र. १२

रयत शिक्षण संस्था, सातारा.
जमीन विभाग,
दि. ०७/०६/२०१९.

सर्व शाखाप्रमुख,
रयत शिक्षण संस्था,

यांना---

**विषय :- सेवकांकडून निवास भाडे, पाणी व लाईट बील याचे सुधारित दराबाबत तसेच शाखांची मैदाने/सभागृह/हॉल/व्यासपीठ लग्न समारंभास किंवा इतर कार्यक्रमास देताना घ्यावयाच्या देणगी मुल्याबाबत.**

**संस्थेच्या एक्झिक्युटीव्ह कमिटीच्या दि. २५/०५/२०१९ रोजीच्या भरलेल्या बैठकीतील ठराव क्र. ७ नुसार** खालीलप्रमाणे निवास भाडे, पाणी बील व लाईट बील आकारणेबाबत तसेच शाखांची क्रिडांगणे/सभागृह/हॉल/व्यासपीठ लग्नकार्य, शैक्षणिक कार्यक्रम, ग्रंथप्रदर्शन, समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम, विविध सांस्कृतिक महोत्सव अथवा वाणिज्यीक वापर यासाठी देवून संबंधिताकडून सुधारित देणगीमुल्य आकारण्यात यावे. सदरचे दर दि. ०१/०६/२०१९ पासून लागू करण्यात येत आहेत. त्याप्रमाणे निवास भाडे, पाणी बील व लाईट बील वसूल करावे.

**ठराव - अ)** संस्थेच्या सेवक निवासामध्ये राहणाऱ्या संस्था सेवकांकडून खालीलप्रमाणे निवास भाडे घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.नं. | तपशील | आर. सी. सी. व स्लॅब दर चौ. फूट | पत्रा/कौलारु इमारत दर चौ. फूट |
|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका | ९ .०० | ४.०० |
| २ | जिल्हा तालुका विभाग | ४.०० | १.२० |
| ३ | इतर ठिकाणे | २.५० | १.०० |

शाखाप्रमुख-१, लेखनिक-१ व शिपाई-१ हे शाखेत राहणे गरजेचे असल्यामुळे त्यांना वरील निवास भाडे दरामध्ये ५०% सवलत देण्यात यावी.

**ब)** संस्थेच्या सेवक निवासामध्ये लाईट व पाण्याचा मिटर हा स्वतंत्र असावा व त्याचे जे बिल येईल ती बिलाची रक्कम संबंधितांनी भरावी. प्रत्येकाला स्वतंत्र कनेक्शन मिळत नसेल तर सबमिटर बसवून प्रत्येकाचे युनिट विचारात घेवून आलेले बिल त्याप्रमाणात विभागून द्यावे.

**क)** संस्थेच्या शाखांची क्रिडांगणे/सभागृह/हॉल/व्यासपीठ लग्नकार्य, शैक्षणिक कार्यक्रम, ग्रंथप्रदर्शन, समाजप्रबोधनाचे कार्यक्रम, विविध सांस्कृतिक महोत्सव अथवा वाणिज्यीक वापर यासाठी देवून

**पान नं. २ वर...**

संबंधिताकडून प्रतीदिन लहान ग्रॉऊंड असल्यास रु.५,०००/- व मोठे ग्रॉऊंड असल्यास रु.१०,०००/- देणगीमुल्य स्वीकारण्यास खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर मिळकत समारंभास मिळणेसाठी संबंधितांचा अर्ज शाखाप्रमुखांनी घेवून स्वतःचे शिफारशीने व स्थानिक स्कूल कमिटी/महाविद्यालय विकास समिती/वसतिगृह व्यवस्थापन समिती ठराव घेवून संस्थेकडे पाठवावा. सदर अर्जास संस्थेकडून अनुमती मिळालेनंतर शाखाप्रमुखांनी पुढील कार्यवाही करावी.

२) शाखाप्रमुखांनी यासंबंधीचे नोंद रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे.

३) सदर हॉल/मैदान/सभागृह या मालमत्तेच्या सुरक्षिततेबाबतचे हमीपत्र संबंधिताकडून लिहून घेणेत यावे.

४) कार्यक्रमानंतर सदरची वापरलेली जागा संबंधिताकडून स्वच्छ करुन घेणेत यावी.

५) वरीलप्रमाणे मिळकतीच्या देणगीचा आकार हा चोवीस तासासाठी आकरणेत यावा.

६) वरील देणगीपेक्षा काही ठिकाणी जादा आकरणी करावयाची झाल्यास त्यासंबंधी स्थानिक व्यवस्थापन समितीचा ठराव घेवून, संस्था परवानगी घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

७) देणगीदारास संस्था किर्दीकडील जमा पावती पुस्तकातील पावती देणेत यावी.

तसेच लेखनिक व शिपाई या सेवकांच्या मुला-मुलीच्या समारंभासाठी मालमत्ता दिल्यास त्यांना वरील दरामध्ये ५०% सूट देण्यात यावी.

सचिव
रयत शिक्षण संस्था, सातारा.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

**१) सहसचिव (उच्च शिक्षण) रयत शिक्षण संस्था, सातारा.**
**२) सहसचिव(माध्यमिक) रयत शिक्षण संस्था, सातारा.**
**३) ऑडिटर, रयत शिक्षण संस्था, सातारा.**
**४) सर्व विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था**
**५) को-ऑर्डिनेटर, रयत शिक्षण संस्था, सातारा.**
**६) सर्व विभागप्रमुख, रयत शिक्षण संस्था, सातारा.**